


# भटक्या विमुक्त जमातींचे साहित्य : स्वरूप आणि दिशा


- संपादक -

डॉ. सूर्यप्रकाश जाधव

- सह संपादक -

डॉ. लक्ष्मण पवार




४१) भटक्या-विमुक्त जमातींच्या साहित्याचे स्वरूप ........ १२८
**प्रा. लोहाळे कविता चंद्रकांतराव**

४२) भटक्या-विमुक्त जमातींच्या साहित्याचे स्वरूप ........ १३०
**बामणपल्ले सुवर्णा महाजन**

४३) भटक्या-विमुक्तांच्या पिढ्यानपिढ्यांच्या भटकंतीतील वनवास : उपरा ........ १३२
**प्रा.डॉ.नरसिंग कदम**

४४) वेदनेचं धुमसत अग्निकुंड : कोल्हाटयाचं पोर ........ १३४
**डॉ. ज्ञानदेव राऊत**

४५) भटक्या विमुक्तांच्या साहित्यातील स्त्री चित्रण ........ १३६
**प्रा. डॉ. संभाजी जाधव**

४६) भटक्या-विमुक्तांच्या साहित्यातील स्त्री-चित्रण ........ १३८
**डॉ.माणिक मानकर**

४७) 'बिराड' मधील प्रारब्धवाद, दैववाद आणि अंधश्रद्धा ........ १४०
**प्रा. डॉ. शिवसांब कापसे**

४८) भटक्या - विमुक्त - बंजारा समाजाचा इतिहास लिहणारे थोर समाज सुधारक बळीराम पाटील ........ १४२
यांचे वाङ्मयीन कार्य - एक आढावा
**प्रा.डॉ.मार्तंड कुलकर्णी**

४९) बंजारा लोकजीवन ........ १४४
**डॉ. चव्हाण एस.डी.**

५०) भटक्या-विमुक्तांच्या साहित्यातील संघर्ष ........ १४६
**प्रा.ज्ञानेश्वर कदम**

५१) 'पारधी' साहित्यातील सामाजिक जाणिवा ........ १४९
**प्रा.लक्ष्मण ना.वाघमारे**

५२) भटक्या-विमुक्त जाती-जमातीच्या साहित्याचे स्वरूप ........ १५१
**प्रा.रामकिशन चंद्रवंशी,**

५३) 'कोल्हाटयाचं पोर' मधील स्त्री वेदना ........ १५४
**प्रा. पंकज प्र. मुक्षोळकर**

५४) 'वेदू' या भटक्या विमुक्त जमातीचे वास्तव : एक अध्ययन ........ १५७
**प्रा.डॉ.डी.के.कदम**

५५) भटक्या विमुक्तांची भाषा ........ १५९
**प्रा.दत्ता बडुरे**

५६) भटक्या-विमुक्ताच्या साहित्याची वोली ........ १६१
**प्रा.गजानन देवकर**

५७) महाराष्ट्रातील भटक्या - विमुक्त जमाती : एक आकलन ........ १६३
**डॉ. राजेंद्र चौधरी**

५८) बंजारा लोकगीते आणि लोकसंस्कृती : एक आकलन ........ १६५
**प्रा. डॉ. शारदा कदम**

५९) आज इथं उद्या तिथं ........ १६७
**डॉ. बालाजी डिघोळे**

ISBN - 978-93-85426-33 -9

# ५४) 'वैदू' या भटक्या विमुक्त जमातीचे वास्तव : एक अध्ययन

**प्रा.डॉ.डी.के.कदम, समाजशास्त्र विभाग प्रमुख, हुतात्मा जयवंतराव पाटील, महाविद्यालय, हिमायतनगर**

**प्रस्तावना :-**

भारतीय समाज हा मुळातच संमिश्र स्वरूपाचा आहे. विविध मानवी समूहाचा त्यात समावेश होतो. जगातील सर्व प्रकारच्या लोकांच्या भारतीय समाजात विविध समुदाय, संस्कृती, वंश, भाषा, धर्म, पंथ, जाती, जमाती इत्यादींचा एक मिलाफ दिसून येतो. भारतीय समाजाचो आदिवासी, ग्रामीण व नागरी समाज या तीन विभागात विभागणी केले आहे. वास्तव पारंपारिक भारतीय समाजरचना जाती व्यवस्थेवर आधारी आहे. प्रत्येक समाजात स्तररचनेची व्यवस्था निर्माण करण्यात आलेली असते. भारतीय समाजातील सामाजिकदृष्ट्या वंचित गटांत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय, अल्पसंख्यांक गट इत्यादीचा समावेश केला जातो. आजही पारंपारिक भारतीय समाजात या भटक्या विमुक्त जमातींना कोणतेही हक्क मिळालेले नाहीत. त्यामुळे विमुक्त भटक्या जमाती मागासलेल्या असल्याचे दिसून येतात.

भारतीय समाजातील अनेक भटक्या विमुक्त जमाती हया सामाजिक अन्यायाचे बळी ठरले आहेत. १८७१ च्या गुन्हेगार जमाती कायदयाने काही जमातींना गुन्हेगार म्हणून नोंदविले होते. परंतु हा कायदा १९५२ साली रद्द केला. गुन्हेगार जमातीतून त्यांची मुक्तता झाली.

'वैदू' या जमातीला भटक्या विमुक्त जमाती म्हणून महाराष्ट्रात ओळखले जाते. या जमातीमध्ये उदरनिर्वाह, शिक्षण, आरोग्य, निवास, स्थलांतर इत्यादी समस्या आहेत. नांदेड जिल्हयात प्रामुख्याने कंधार, अर्धापुर आणि हदगांव या तीन तालुक्यात 'वैदू' या भटक्या विमुक्त जमातीचे लोक वास्तव करतात. या जमातीचे सतत स्थलांतर चालू राहते. हदगांव तालुक्यात 'निवघा' या ठिकाणी 'वैदू' या भटक्या विमुक्त जमातीचे लोक जास्त आहेत. संशोधकाने त्यांच्या वास्तविक जीवनाचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न या प्रस्तुत शोधनिबंधात केला आहे.

**संशोधन पद्धती :-**

**अ) संशोधनाची उद्दिष्टे :-**

१) वैदू या भटक्या विमुक्त जमातीचे जीवन समजावून घेणे.

२) वैदू भटक्या जमातीच्या समस्या समजून घेणे.

३) वैदू भटक्या जमातीच्या समस्यांवर उपाययोजना सुचविणे.

**ब) अभ्यास पद्धती :-**

प्रस्तुत शोधनिबंधाच्या संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन आराखडा या पद्धतीचा उपयोग केला आहे.

**क) तथ्ये संकलनाचे स्त्रोत :-**

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक आणि दुय्यम स्त्रोताचा उपयोग केला. प्राथमिक स्त्रोतांत मुलाखत आणि निरीक्षण या तंत्राचा उपयोग केला. दुय्यम स्त्रोत विषयाशी संबंधित लिखीत साहित्याचा उपयोग केला आहे.

**तथ्य विश्लेषण :-**

भारतीय समाजातील एक दुर्बल व उपेक्षित घटक म्हणून भटक्या विमुक्त जमातींच्या लोकांचा उल्लेख केला जातो. भारतीय समाजातील सर्वात उपेक्षित घटक म्हणून भटक्या जमातीच्या लोकांकडे पाहिले जाते. भारतीय समाजातील अनुसूचित जातीच्या लोकांना गावाबाहेर, गावकुसावर राहण्यासाठी किमान जागा तरी दिली होती. विमुक्त व भटक्या जमातीच्या लोकांना राहण्यासाठी गावात जागा सुद्धा मिळाली नाही. संसाराचे बिऱ्हाड पाठीवर घेऊन उदरनिर्वाहासाठी सतत भटकंती करीत राहणे त्यांच्या वाटयाला आले होते. अनुसूचित जात, अन्य दुर्बल घटकापेक्षा ही जमात वैदू या भटक्या विमुक्त मागासलेली आहे. जवळपास ४०० ते ५०० कुटूंब नांदेड जिल्हयात हदगांव तालुक्यातील निवघा या ठिकाणी वास्तव्यास आहे. परंतु या वैदू जमातीचे लोक आपल्या उदरनिर्वाह भागविण्यासाठी स्थलांतर होतांना दिसून आले. वैदू भटक्या विमुक्त जमातीच्या लोकांना स्थलांतराचे ठिकाण चांगले वाटले तर ते त्या ठिकाणी अनेक वर्ष आपले पाल टाकून वास्तव्य करतांना दिसून आले. हिमायतनगर, किनवट, सारखणी या ठिकाणी निवघा येथील वैदू या भटक्या जमातीचे लोक आहेत.

वैदू या भटक्या विमुक्त जमातीचे लोक पारंपारीक जीवन जगतात. 'खंडोबा' आणि 'सटवाई' या दोन देव-दैवताची पुजा करतात. खंडोबा जय मल्हार हा या जमातीचे कुलदैवत आहे. खंडोबाची भक्ती करतांना दिसून येतात. गावात येऊन खंडोबा देवाला बोकड कापून कंदोरी करतात. वैदू लोक आपल्या उदरनिर्वाहासाठी ते इतरत्र भटकंती करीत असले तरी नांदेड जिल्हयातील माळेगांव येथील यात्रेला सर्वजन

ISBN - 978-93-85426-33 -9

जातात. यावरुन हे स्पष्ट होते की, माळेगावचा खंडोबा हे भक्तीचे श्रद्धास्थान आहे. गावात 'सटवाई' या देवीची पुजा करतात सटवाई देवीला बोकड कापून कंदोरी करतात.

वैदू या भटक्या विमुक्त जमातीचा व्यवसाय जाणून घेण्याचा प्रयत्न केला. वैदू या भटक्या विमुक्त जमातीचा मुख्य व्यवसाय जडीबुटी, चाळणी डब्बे, तुमडी काढणे हा पुरुषांचा मुख्य व्यवसाय आहे.

वैदू या भटक्या विमुक्त जमातीचे लोक जडीबुटीचा व्यवसाय करतात. जंगलात जावून जंगलातील औषधी वनस्पतीचा पाला, वनस्पतीची मुळे, वनस्पतीची साल, वनस्पतींचा डींक, दुर्मिळ जंगलातील फळे आणून त्यापासून जडीबुटीचे औषध करुन विकतांना दिसून येतात. वैदू भटक्या विमुक्त जमातीचे लोक तुमडी काढणे हा व्यवसाय करतात. तुमडी म्हणजे त्यांच्याकडे एक चिलमीच्या आकाराचे साधन असते. ज्यावेळी व्यक्तीला उंदिर, साप, पाल, किडा चावा घेतो त्या ठिकाणी व्यक्तीच्या शरीरात विष जावून ती जागा काळी पडते. तेंव्हा हे वैदू लोक तुमडीने ते विष काढण्याचे काम करतात. अनेक लोकांच्या कानातील मळ या तुमडीव्दारे काढतात. तुमडीच्या कामा पासून १०, २० ते ३० रुपये मिळतात. परंतु हे काम लागतेच खात्री नसते.

चाळणी डब्बे हा व्यवसाय वैदू या भटक्या विमुक्त जमातीचे लोक करतांना दिसून येतात. एखादया गावात आपले पाल टाकून येथे चाळणी डब्बे तयार केली जातात. ही चाळणी डब्बे जवळपास खेडयापाडयात विकली जातात. वैदू या भटक्या विमुक्त जमातीच्या स्त्री या केसाला पिना, फुगे विकण्याचा व्यवसाय करतात. पिना, फुगे स्त्रियांना लागणारे साहित्य विकतात किंवा केसाच्या बदल्यात ते देतात. या स्त्रीयांच्या व्यवसायाला बाळी बुगडीचा व्यवसाय ही म्हणतात. आज परिवर्तन झाल्यामुळे स्त्रीयासाठी आधुनिक पध्दतीचे कानातील, नाकातील, कपाळावरील टिकली इत्यादी स्त्रीयांचे साहित्य तालुका किंवा जिल्हयाच्या ठिकाणावरुन खरेदी करुन खेडयापाडयात विकतांना दिसून येतात. हया स्त्रीया हा व्यवसाय करतांना शिळे, पाते अन्न आपला उदरनिर्वाह भागविण्यासाठी मागतांना दिसून येतात.

वैदू या भटक्या विमुक्त जमातीकडे उत्पादनाचे मुख्य स्त्रोत कोणतेही नाही फक्त २ टक्के लोकांकडे शेती आहे. ही अल्प शेती कोरडवाहू त्यामुळे त्यांना आपला उदरनिर्वाह भागविण्यासाठी पुरुषांना जडीबुटी, तुमडी, चाळणी व डब्बे विकणे हा व्यवसाय करावा लागतो. तर स्त्रीयांना बाळी, बुगडी, पिना, फुगे विकण्याचा व्यवसाय करावा लागतो. आजही ९८ टक्के वैदू या भटक्या विमुक्त जमातीच्या लोकांकडे शेती नाही. आज शिक्षणाचा प्रसार, विज्ञान तंत्राचा विकास, दळणवळणाचे साधने यामुळे या जमातीचा व्यवसाय चालत नाही. त्यामुळे परिणामी त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे.

वैदू या भटक्या विमुक्त जमातीच्या निवासा विषयी माहिती घेतली असता त्यात त्यांच्या गावी पत्राचे घरे आहेत. परंतु हे लोक आपले गाव सोडून स्थलांतर करतात. ज्या ठिकाणी आपले पाल उभे करतात तेथेही अतिशय घाण असते. त्याला एक झोपडपट्टीचे स्वरूप प्राप्त झालेले असते. त्या ठिकाणी कुत्रे, डुकरे हे प्राणी असतात. त्यामुळे त्यांच्या आरोग्याचा प्रश्न अतिशय गंभीर स्वरूपाचा आहे.

वैदू या भटक्या विमुक्त जमातीचे लोकांमध्ये शिक्षणाचे प्रमाण अतिशय कमी आहे. कारण आतापर्यंत वैदू जमातीचे लोक शिक्षण घेत नव्हते. परंतु आज वैदू या भटक्या विमुक्त जमातीची मुले शाळेत जातांना दिसून येतात. मग त्यांना गुणवत्ता पूर्ण शिक्षण मिळत नाही. त्यांचे आई-वडील सकाळी सकाळी खेडयात व्यवसायाला जातात तेंव्हा ही मुले आपल्या पालाची राखण करत बसतांना दिसून येतात.

आज वैदू या भटक्या विमुक्त जमातीच्या समोर आर्थिक समस्या आरोग्य विषयक समस्या, शिक्षणाविषयी समस्या आहेत. वैदू लोकांना उत्पादनाचे कोणतेही साधन नाही. जो व्यवसाय करतात त्यापासून त्यांना अतिशय कमी मोबदला मिळतो. व्यवसाय करतांना म्हणजेच तुमडी काढतांना दुसऱ्याच्या शरीरातील साप, उंदीर, पाल, विषारी किडा यांचे विष काढतांना त्यांच्या तोंडात जावून आरोग्याला धोक होऊ शकतो. स्त्रीयाही केस घेऊन पिना, फुगे विकतात. त्यातही आरोग्याचा प्रश्न निर्माण होतो. निवासाचे ठिकाण चांगले नसल्यामुळे अनेक रोगांना बळी पडतांना दिसून येतात.

**उपाययोजना :-**

१) वैदू या भटक्या जमातीला कायम कसण्यासाठी शासनाने गायरान पडीक जमिनी दयाव्यात.

२) वैदू भटक्या जमातीसाठी विशेष महामंडळाची सोय करुन त्यांना व्यवसायासाठी अर्थसहाय्य करावे.

३) वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाचे अर्थसहाय्य मिळून दयावे.

४) वैदू या भटक्या विमुक्त जमातीच्या मुलांसाठी शिक्षणाची सोय करावी.

**संदर्भसूची :-**

१) प्रा.व्हि.बी.पाटील, मानवी हक्क - के.सागर पब्लिकेशन्स, पुणे ४११०३०.

२) प्रा.ए.वाय.कोंडेकर व प्रा.विजय मासलकर - फडके प्रकाशन, कोल्हापूर ४१६०१२.

३) प्रत्यक्ष मुलाखत स्त्रोत.

४) निरीक्षण स्त्रोत.